ग्रंथमालिका ‘धार्मिक कृतींमागील शास्त्र’ : देवपूजा – खंड २

# पूजासाहित्याचे महत्त्व

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते**

**श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ**

**सौ. प्रियांका सुयश गाडगीळ**

**कु. मधुरा भिकाजी भोसले आणि अन्य**




## सनातन संस्था


**सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !**

सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे ‘सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान’ असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १.२.२०२४ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०५१ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९८

# सनातनच्या सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांचे अद्वितीयत्व !



श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ



सौ. प्रियांका सुयश गाडगीळ



कु. मधुरा भिकाजी भोसले

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते साधक पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयांवरील सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. वर्ष २००३ पासून त्यांना मिळणारे हे ज्ञान सनातनच्या साधारणपणे ६० हून अधिक ग्रंथांत घेतले आहे. ईश्वराकडून मिळणारे हे ज्ञान ग्रहण करण्यासाठी त्या साधकांना वाईट शक्तींच्या आक्रमणांनाही तोंड द्यावे लागते. असे असले, तरी गुरुकृपेच्या बळावर ते ही सेवा करतच आहेत.

---

## अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**

१. पूजेच्या तबकातील घटकांची मांडणी कशा प्रकारे करावी ? १०

२. सप्तनद्यांचे जल ११

३. कापसाचे वस्त्र १४

३ अ. कापसाचे वस्त्र बनवतांना (वळतांना) दुधाचा किंवा गंधाचा वापर का करावा ? १४

४. जानवे १४

४ अ. देवतांना जानवे अर्पण करण्यामागील (घालण्यामागील) शास्त्र काय ? १४

५. हळद, कुंकू, शेंदूर, गुलाल आणि गंध १५

६. अत्तर ३५

६ अ. देवतांना अत्तर अर्पण करण्यामागील शास्त्र काय ? ३५

७. फुले ८. पत्री ३५

८ अ. कोणत्या देवतेला कोणती पत्री का आणि किती वाहावी ? ३५

९. अक्षता ३९

९ अ. अक्षतांचे तांदूळ अखंड का असावेत ? ४०

१०. गंधाक्षता, अष्टगंध, गंध (चंदन), रक्तचंदन, हळद, कुंकू, बुक्का आणि शेंदूर यांचे महत्त्व ४४

११. विड्याचे पान १२. सुपारी ४७

१३. नारळ ५०

१३ अ. नारळाला 'श्रीफळ' म्हणजे सर्वांत शुभफल का म्हणतात ?५०

१४. पंचखाद्य (सुका मेवा), पाच फळे आणि हळकुंड ५०

१५. निरांजनातील वात १६. उदबत्ती आणि धूप ५१

१७. कापूर १८. नैवेद्य ६१

१९. दक्षिणा २०. भस्म, गायीचे शेण आणि पाणी ६३

२१. रांगोळी २२. पंचगव्य ६५

२३. पूजासाहित्याच्या घटकांकडून शिकायला मिळणारे गुण ६८

२४. पूजेशी संबंधित विविध वस्तू, त्यांच्यामुळे होणाऱ्या लाभाचे प्रमाण, शुद्धी होण्याचे माध्यम आणि शुद्धी होणारा देह ६९

卐 **प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** ७०

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ७२

## 卐 — ‘धार्मिक कृतींमागील शास्त्र’ या ग्रंथमालिकेचे मनोगत — 卐

पूर्वीच्या काळी हिंदूंच्या शिक्षणपद्धतीत ‘धर्म’ या विषयाचा अंतर्भाव असायचा. धर्माचे महत्त्व कळल्याने बहुसंख्य हिंदूंच्या जीवनाचा केंद्रबिंदू धर्म हाच असायचा. कालांतराने हिंदूंना धर्मशिक्षण न मिळाल्याने साहजिकच हिंदूंची धर्माचरणाची प्रवृत्ती घटली. सांप्रत सण, उत्सव, व्रते, तसेच परंपरागत धार्मिक कृती यांच्यामुळे बहुतांश हिंदूंची धर्मनिष्ठा व ईश्वरोपासना टिकून आहे. विविध नित्य आणि नैमित्तिक धार्मिक कृतींना हिंदूंच्या सामाजिक, सांस्कृतिक अन् आध्यात्मिक जीवनात म्हणूनच महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. धार्मिक कृतींमध्ये दैनंदिन पूजा-अर्चा, देवळात जाणे यांपासून मृत्यूनंतर करावयाच्या कृतीपर्यंतच्या अनेक गोष्टींचा समावेश होतो. या धार्मिक कृती आजही तेवढ्याच श्रद्धेने केल्या जाण्यामागील कारण म्हणजे या कृतींमागील सिद्ध अध्यात्मशास्त्राची सर्वांना आलेली प्रचीती होय.

धार्मिक कृती करणाऱ्याला त्या कृतीमागील नेमके शास्त्र समजल्यास त्याचा त्या कृतीसंबंधी विश्वास वाढतो आणि त्या कृतीचे महत्त्व लक्षात येऊन ती श्रद्धेने होते. श्रद्धापूर्वक तसेच अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्य केलेल्या, कृतीचे फळ अधिक चांगले (उत्तम) मिळते. सध्या उपलब्ध असलेल्या धर्मशास्त्राविषयीच्या ग्रंथांत धार्मिक कृती करण्याविषयी विवेचन केले आहे; पण त्यामागील सूक्ष्म स्तरावरील आध्यात्मिक कारणमीमांसा दिलेली नाही. ‘धार्मिक कृतींमागील शास्त्र ?’ या ईश्वरी कृपेमुळे प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या ग्रंथमालिकेचे वैशिष्ट्य असे की, यात धार्मिक कृतींमागील सूक्ष्म अध्यात्मशास्त्र स्पष्ट करण्यासह त्या कृती करण्याच्या योग्य पद्धतीही सांगितल्या आहेत.

आधीची पिढी जुनेजाणते सांगत असलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवून तशी कृती करत असे. सध्याच्या तरुणपिढीचा कल प्रत्येक गोष्टीची कारणमीमांसा जाणून घेऊन मगच ती स्वीकारण्याकडे असतो. धार्मिक कृतींमागील शास्त्रीय कारणमीमांसा कळल्यास तरुण पिढीही अध्यात्माकडे आकृष्ट होईल.

या ग्रंथात दिलेल्या धार्मिक कृतींचे आचरण करण्याची सद्‌बुद्धी प्रत्येकाला होवो अन् त्याची आध्यात्मिक उन्नती होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

**टीप :** ग्रंथातील काही सूत्रांच्या (मुद्द्यांच्या) शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या 'सच्चिदानंद परब्रह्म' या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये 'प.पू.' आणि 'परात्पर गुरु' या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

---

## सनातनच्या दोन सद्‌गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी–वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्‌गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ' आणि सद्‌गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ' असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.

| वाचा : सनातनचा लघुग्रंथ | **देवघर अन् पूजेतील उपकरणे** **(शास्त्रीय महत्त्व आणि मांडणी)** |
| --- | --- |

## प्रस्तावना

काही धार्मिक कृती अन्य घटकांच्या साहाय्याविना पूर्ण होऊ शकत नाहीत, उदा. देवपूजेत पूजासाहित्य असणे आवश्यक असते. धार्मिक कृतीत साहाय्यभूत ठरणारे हे घटक धार्मिक कृतीद्वारे ईश्वराची कृपा प्राप्त होण्यातील महत्त्वाचा दुवा ठरतात. या प्रत्येक घटकाचे अध्यात्मशास्त्रीय महत्त्व जाणून घेतल्यास या घटकांप्रती भाव निर्माण होऊन धार्मिक कृती अधिक भावपूर्ण होण्यास साहाय्य होते. हाच उद्देश लक्षात घेऊन या ग्रंथात हळद, कुंकू, गंध, फुले, अक्षता, सुपारी, नारळ, पंचखाद्य, उदबत्ती, कापूर इत्यादी पूजासाहित्याच्या घटकांचे अध्यात्मशास्त्रीय महत्त्व आणि वैशिष्ट्ये दिली आहेत. – **संकलक**


**कर्मबंधनातून मुक्त होण्याची नामी युक्ती सांगणारे सनातनचे ग्रंथ !**

### नामजपाचे महत्त्व आणि लाभ



- देवाच्या रूपापेक्षा त्याचे नाम का महत्त्वाचे ?
- नियमित नामजपामुळे एकाग्रता कशी वाढते ?
- ध्यान लावण्यापेक्षा नामजप अधिक श्रेष्ठ का ?
- वास्तूशुद्धीसाठी नामजप करणे उपयुक्त कसे ?

### नामजप करण्याच्या पद्धती



- नामजप चालू करण्यापूर्वी प्रार्थना का करावी ?
- साधनेत आरंभी जप लिहिण्याचे महत्त्व काय ?
- जपासाठी कोणत्या प्रकारची माळ वापरावी ?
- नाम श्वासाला जोडण्याची योग्य पद्धत कोणती ?